# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक तात्काळ**

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४८/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २९ जानेवारी, २०२६

प्रति,
जिल्हाधिकारी,
रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर,
छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशीव व लातूर

विषय:- राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका

संदर्भ :- १) मा. सर्वोच्च न्यायालयाने दाखल पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल(सी) क्र.१९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५, दि.१६/०९/२०२५, दि.२८/११/२०२५ व दि.१२/०१/२०२६ रोजी दिलेले आदेश

२) राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.१३ जानेवारी, २०२६ रोजीचे पत्र

३) राज्य शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील क्र. DIP-2026/CR-20/ Proto-1, दि.२८/०१/२०२६ रोजीचा बिनतारी संदेश

महोदय/महोदया,

राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भाधीन अ.क्र. २ समोरील दि.१३/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. सदर निवडणूक कार्यक्रमानुसार संबंधित जिल्हा कार्यालयांनी दि.२७/०१/२०२६ रोजी उमेदवारी मागे घेणे आणि चिन्ह वाटपानंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आली असून मतदान, मतमोजणी व निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करण हे टप्पे पार पडणे शिल्लक आहेत.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१२/०१/२०२६ रोजी राज्य निवडणूक आयोगाला निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दि.३१/०१/२०२६ च्या पुढे २ आठवड्यांची मुदत दिलेली आहे. मात्र, दि.२८/०१/२०२६ रोजी महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री श्री. अजित आशाताई अनंतराव पवार यांच्या अपघाती निधनामुळे राज्य शासनाने संदर्भाधीन अ.क्र.३ समोरील दि.२८/०१/२०२६ रोजीच्या बिनतारी संदेशान्वये राज्यात दि.२८/०१/२०२६ ते दि.३०/०१/२०२६ पर्यंत राज्य स्तरावरील दुखवटा जाहीर केला आहे.

३. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना उपरोक्त परिच्छेदातील नमूद कालावधीमध्ये प्रचार करणे सोयीचे होणार नसल्याने परिणामी मतदान व मतमोजणी इ. निवडणूक टप्पे निश्चित केलेल्या दिनांकास पार पाडणे शक्य होणार नाही.

४.	उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग आणि निवडणुका घेणे) नियम, १९६२ तसेच महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणुका घेणे) नियम, १९६२ यामधील अनुक्रमे नियम ११ (२अ) आणि नियम १३(३) मधील तरतुदीनुसार १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा परिच्छेद-१ मध्ये नमूद केलेल्या उर्वरित टप्प्यांचा निवडणूक कार्यक्रम नव्याने देणे आवश्यक झाले आहे.

५.	तरी यासोबतच्या परिशिष्ट-१ नुसार सुधारीत निवडणूक कार्यक्रम देण्यात येत असून जिल्हाधिकारी यांनी सदर निवडणूक कार्यक्रमातील वेळापत्रकानुसार निवडणुकीचा कार्यक्रम राबविण्यात यावा. तसेच जिल्हाधिकारी यांनी निवडणुकीच्या सुधारित कार्यक्रमाची सुचना दि. ३१/०१/२०२६ रोजी प्रसिध्द करून सदर कार्यक्रमास आवश्यकतेनुसार व नियमाप्रमाणे व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

६.	निवडणुकीची आचारसंहिता सध्या सुरु असून निवडणुकीचा निकाल घोषित होइपर्यंत अंमलात राहील. तसेच राज्य निवडणूक आयोगाचे दि.१३/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचनांचे जिल्हाधिकारी यांनी पालन करावे.

७.	सदरचा निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. राज्य निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ व ईमेल आयडी पुढीलप्रमाणे आहे :-

संकेत स्थळ : https://mahasec.maharashtra.gov.in

ई-मेल : sec.zpps@mah.gov.in

मा.राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला

(स्वाक्षरी) २८.०१.२०२६

( सुरेश काकांणी )

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

३) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग

४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

५) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१

६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

७) विभागीय आयुक्त, कोकण, पुणे व छत्रपती संभाजीनगर

८) सर्व संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक

९) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४

१०) मा. सर्वोच्च न्यायालय व मा. मुंबई उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे पॅनलवरील सर्व वकील

११) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई

१२) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

१३) निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग.

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४८/का.७, दि.२९/०१/२०२६ सोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट-१

## राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका सुधारीत कार्यक्रम-२०२६

| अ.क्र. | कार्यक्रमाचा तपशिल | कार्यक्रमाचा दिनांक |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी यांनी निवडणुकीच्या सुधारित कार्यक्रमाची सुचना प्रसिध्द करण्याची तारीख | दि. ३१/०१/२०२६ (शनिवार) |
| २ | मतदानाची तारीख | दि.०७ फेब्रुवारी २०२६ (शनिवार) **( सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत )** |
| ३ | मतमोजणी तारीख | दि.०९ फेब्रुवारी २०२६ (सोमवार) **( सकाळी १०.०० पासून )** |
| ४ | निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात प्रसिध्द करणे | दि.११ फेब्रुवारी २०२६ (बुधवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

२९.०१.२०२६

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र